RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ७४] बुधवार, जून १७, २०२६/ज्येष्ठ २७, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २३३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृहनिर्माण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ जून २०२६.

### अधिसूचना

**आधार (आर्थिक आणि इतर अनुदान, लाभ आणि सेवांची लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक पीएमएवाय-२.०-२०२५/सीआर-१७२/जीएनडी-२.—ज्याअर्थी, शासकीय सेवा किंवा लाभ किंवा अनुदान वितरणासाठी ओळखपत्र म्हणून आधारचा वापर केल्याने शासकीय वितरण प्रक्रिया सुलभ होते, पारदर्शकता आणि परिणामकारकता येते, तसेच लाभार्थींना त्यांचे लाभ सहज व सुलभरित्या मिळणे, ज्यायोगे एखाद्याची ओळख सिद्ध करण्यासाठी एकापेक्षा अनेक कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता न राहणे ;

आणि ज्याअर्थी, गृहनिर्माण विभाग (यापुढे ज्याचा " विभाग " असा उल्लेख करण्यात येत आहे) हे राज्यातील पात्र लाभार्थींना आर्थिक सहाय्य आणि अनुदान प्रदान करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० (यापुढे ज्याचा " योजना " असा उल्लेख करण्यात येत आहे) राबवित आहे, सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार, सर्व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, प्रादेशिक विकास प्राधिकरण आणि शासनाने या संदर्भात अधिकृत केलेल्या इतर संस्थांमार्फत (यापुढे ज्याचा " अंमलबजावणी यंत्रणा " असा उल्लेख करण्यात येत आहे) राबविण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, या योजनेंतर्गत, पात्र लाभार्थी म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (ईडब्ल्यूएस), शहरी भागात राहणारे आणि देशाच्या कुठल्याही भागात ज्याचे पक्के घर नाही, अशा कुटुबांतील पती, पत्नी, अविवाहित मुलगा/मुलगी हे या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी असतील, ज्याचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) वगळता राज्यात इतरत्र रुपये तीन लाखांपर्यंत आणि मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) क्षेत्रासाठी रुपये सहा लाखांपर्यंत असेल, असे लाभार्थी या योजनेंतर्गत निश्चित केलेल्या कोणत्याही एका घटकांतर्गत लाभ घेऊ शकतात. (यापुढे ज्याचा " पात्र लाभार्थी " असा उल्लेख करण्यात येत आहे) ;

आणि ज्याअर्थी, सदर योजनेंतर्गत, केंद्र शासन आणि राज्य शासनाचे अनुदान, जसे की व्यक्तिगत स्वरुपातील घरकुल बांधकाम (बीएलसी) आणि भागीदारी तत्त्वावरील परवडणारी घरे योजना (एएचपी) अंतर्गत केंद्र हिश्शापोटी प्रति घरकुले रुपये एक लाख पन्नास हजार आणि राज्य हिश्शापोटी प्रति घरकुले एक लाख अनुदान तसेच परवडणारी भाडे तत्वावरील घरांसाठी (एआरएच) नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अनुदान म्हणून केंद्र हिश्शापोटी रुपये तीन हजार प्रति चौ. मी. प्रति घरकुल व राज्य हिश्श्यापोटी रुपये दोन हजार प्रति चौ.मी. प्रति घरकुल तसेच योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार इतर अनुषांगिक लाभ (यापुढे ज्याचा "अनुदान" असा उल्लेख करण्यात येत आहे) अंमलबजावणी यंत्रणामार्फत पात्र लाभार्थींना वितरित केले जाईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त योजनेमध्ये राज्य शासनाच्या हिश्श्याकरिता महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीतून होणारा पुनरावर्ती खर्च समाविष्ट आहे ;

त्याअर्थी, आधार (वित्तीय आणि इतर अनुदाने, लाभ आणि सेवांची लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ (१८ पैकी २०१६) (यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " म्हणून उल्लेख करण्यात येत आहे) च्या कलम ७ अन्वये, महाराष्ट्र शासन याद्वारे खालीलप्रमाणे अधिसूचित करते, म्हणजे :—

**१.** (१) योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने एकात्मिक संकेत स्थळावर (Unified Web Portal) नोंदणी करणे आणि आधार क्रमांक असल्याचा पुरावा देणे किंवा आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक असेल ;

(२) योजनेंतर्गत लाभ प्राप्त करून घेणारी कोणतीही व्यक्ती, जिच्याकडे आधार क्रमांक नाही किंवा जिने अद्याप आधारसाठी नोंदणी केलेली नाही, तिने योजनेसाठी नोंदणी करण्यापूर्वी आधार नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक असेल, अटी व शर्तींच्या अधीन राहून अशी व्यक्ती उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार आधार क्रमांक मिळवण्यास पात्र असेल, आणि अशा व्यक्तीने आधारसाठी नोंदणी करण्यासाठी युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया (यूआयडीएआय) च्या संकेतस्थळावर (*www.uidai.gov.in*) उपलब्ध आधार नोंदणी केंद्राच्या यादीपैकी कोणत्याही आधार नोंदणी केंद्राला भेट द्यावी ;

(३) आधार (नोंदणी आणि अद्यावत) विनियम, २०१६ च्या विनियम १२ नुसार, विभागाने अंमलबजावणी यंत्रणांमार्फत, ज्या लाभार्थ्यांनी अद्याप आधारसाठी नोंदणी केलेली नाही अशा लाभार्थ्यांसाठी आधार नोंदणी सुविधा प्रदान करणे आवश्यक आहे, आणि जर संबंधित गट, तालुका किंवा तहसीलमध्ये कोणतेही आधार नोंदणी केंद्र नसेल, तर विभाग त्याच्या अंमलबजावणी यंत्रणांमार्फत, यूआयडीएआयच्या विद्यमान नोंदणीकर्त्यांशी समन्वय साधून किंवा स्वतः यूआयडीएआय नोंदणीकर्ता बनून सोयीस्कर ठिकाणी आधार नोंदणी सुविधा प्रदान करेल :

परंतु, जोपर्यंत व्यक्तीला आधार क्रमांक प्रदान केला जात नाही, तोपर्यंत योजनेंतर्गत लाभ त्या व्यक्तीला खालील कागदपत्रे सादर करण्याच्या अधीन राहून दिले जातील, म्हणजे :—

(*a*) त्याने/तिने नोंदणी केली असल्यास, त्याचा/तिचा आधार नोंदणी पोचपावती; आणि

(*b*) खालीलपैकी कोणतेही कागदपत्रे, म्हणजे :—

(*i*) छायाचित्रासह बँक किंवा पोस्ट ऑफिस पासबुक ; किंवा

(*ii*) शासनाने विनिर्दिष्ट केलेले कोणतेही इतर कागदपत्रे :

परंतु पुढे असे की, वरील कागदपत्रे संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने त्या उद्देशासाठी विशेषतः नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडून तपासण्यात येतील.

**२.** योजनेंतर्गत, लाभार्थींना सहजरित्या लाभ मिळावा यासाठी उक्त आवश्यक बाबींबाबत लाभार्थींना माहिती करून देण्याकरिता प्रसिद्ध माध्यमांद्वारे व्यापक प्रसिद्धी करण्यात येईल याची विभाग आपल्या अंमलबजावणी यंत्रणेच्या माध्यमातून व्यवस्था करेल.

**३.** जेथे लाभार्थींच्या अस्पष्ट बायोमेट्रिक्समुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आधार प्रमाणीकरण शक्य होत नाही, तेथे खालील उपाययोजना अवलंबण्यात येतील : —

(*a*) बोटांच्या ठशांची गुणवत्ता खराब असल्यास, प्रमाणीकरणासाठी इंटिग्रेटेड रिस्क इन्फॉर्मेशन सिस्टम स्कॅन किंवा चेहरा प्रमाणीकरण सुविधा अवलंबली जाईल, त्यायोगे विभाग त्याच्या अंमलबजावणी यंत्रणांमार्फत सुलभरित्या लाभ वितरणासाठी बोटांचे ठसे प्रमाणीकरणासह इंटिग्रेटेड रिस्क इन्फॉर्मेशन सिस्टम स्कॅनर किंवा चेहरा प्रमाणीकरणाची व्यवस्था करेल ;

(*b*) बोटांचे ठसे किंवा इंटिग्रेटेड रिस्क इन्फॉर्मेशन सिस्टम स्कॅन किंवा चेहरा प्रमाणीकरणाद्वारे बायोमेट्रिक प्रमाणीकरण यशस्वी न झाल्यास, जिथे शक्य आणि स्वीकार्य असेल तिथे आधार वन-टाइम पासवर्ड (ओटीपी) किंवा टाइम-बेस्ड वन-टाइम पासवर्ड (टीओटीपी) अधिप्रमाणीकरण मर्यादित वेळ वैधतेसह, यथास्थिती उपलब्ध करून दिले जाईल ;

(*c*) इतर सर्व प्रकरणांमध्ये, जिथे बायोमेट्रिक किंवा आधार वन-टाइम पासवर्ड (ओटीपी) किंवा टाइम-बेस्ड वन-टाइम पासवर्ड (टीओटीपी) प्रमाणीकरण शक्य नसेल, तिथे योजनेंतर्गत लाभ भौतिक आधार पत्राच्या आधारे दिला जाऊ शकतो, ज्याची सत्यता आधार पत्रावर छापलेल्या क्विक रिस्पॉन्स (क्यूआर) कोडद्वारे तपासता येते आणि क्विक रिस्पॉन्स कोड वाचकाची आवश्यक व्यवस्था विभागाद्वारे त्याच्या अंमलबजावणी यंत्रणांमार्फत सोयीस्कर ठिकाणी केली जाईल.

**४.** उपरोक्त मुद्यांव्यतिरिक्त, योजनेअंतर्गत कोणताही पात्र लाभार्थी त्याच्या/तिच्या वास्तविक लाभापासून वंचित राहू नये, याची खात्री करण्यासाठी विभागामार्फत त्याच्या अंमलबजावणी यंत्रणांद्वारे भारत सरकार, मंत्रिमंडळ सचिवालय, थेट लाभ हस्तांतरण (DBT) मिशन यांच्या दिनांक १९ डिसेंबर २०१७ च्या कार्यालयीन ज्ञापनामध्ये नमूद केल्यानुसार अपवादात्मक प्रकरणांची हाताळणी करण्यात येईल. ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत **राजपत्रात** प्रकाशित झाल्यापासून लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

**चंद्रशेखर तरंगे,**
शासनाचे उप सचिव.

## HOUSING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 17th June 2026.

*NOTIFICATION*

Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016.

No. PMAY-2.0-2025/CR-172/GND-2.—Whereas, the use of Aadhaar as an identity document for the delivery of services or benefits or subsidies simplifies the Government delivery processes, brings in transparency and efficiency, and enables beneficiaries to receive their entitlements directly in a convenient and seamless manner by obviating the need for producing multiple documents to prove one's identity ;

And whereas, the Housing Department (hereinafter referred to as " the Department ") is administering the Pradhan Mantri Awas Yojana (Urban) 2.0 (hereinafter referred to as "the Scheme") for providing financial assistance and subsidies to eligible beneficiaries in the State in accordance with the Scheme guidelines and the Government Resolution, dated the 15th October 2024, which is being implemented through all the concerned Urban Local Bodies, Regional Development Authorities and other Agencies authorised by the Government in this behalf, (hereinafter referred to as "the implementing Agencies") ;

And whereas, under the Scheme, the eligible beneficiary means a member of family belonging to the economically weaker section (EWS) category, residing in urban areas and not owning a pucca house anywhere in the country, who can be a husband, wife, unmarried son or unmarried daughter from the family, having an annual income up to rupees Three Lakh classified as Economically Weaker Section (EWS) across the State and rupees Six Lakh for Mumbai Metropolitan Region (MMR) area, to purchase or construct a house or avail benefit for only one vertical component of the Scheme (hereinafter referred to as "the eligible beneficiary") ;

And whereas, under the said Scheme, subsidies of the Central Government and the State Government, such as Central Assistance of rupees One Lakh Fifty Thousand per unit and State Government Assistance of rupees One Lakh per unit under beneficiary lead construction (BLC) and affordable housing in Partnership (AHP) and Technology Innovation Grant (Central assistance) of rupees Three Thousand per sq.m. per unit and (State assistance) of rupees Two Thousand per sq.m. per unit under affordable rental housing (ARH) (hereinafter referred to as "the benefit") are disbursed through the implementing Agencies to eligible beneficiaries and all other grants in accordance with the extant Scheme guidelines ;

And whereas, the aforesaid Scheme involves recurring expenditure incurred from the Consolidated Fund of the State of Maharashtra towards the share of the State Government ;

Now, therefore, in pursuance of section 7 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 (18 of 2016) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra hereby notifies the following, namely : —

**1.** (*1*) An individual eligible to receive benefits under the Scheme shall be required to register on the Unified Web Portal and furnish proof of possession of Aadhaar number or undergo Aadhaar authentication ;

(*2*) Any individual desirous of availing benefits under the Scheme, who does not possess an Aadhaar number or, has not yet enrolled for Aadhaar, shall be required to make application for Aadhaar enrolment before registering for the Scheme, provided that such individual is entitled to obtain Aadhaar number as per section 3 of the said Act, and such individual shall visit any Aadhaar Enrolment Centre list available at Unique Identification Authority of India (UIDAI), website *www.uidai.gov.in* to get enrolled for Aadhaar ;

(*3*) As per regulation 12 of the Aadhaar (Enrolment and Update) Regulations, 2016, the Department through its implementing Agencies, is required to after Aadhaar enrolment facilities for

the beneficiaries who are not yet enrolled for Aadhaar and in case there is no Aadhaar Enrolment Centre is located in the respective Block, Taluka or Tehsil, the Department through its implementing Agencies, shall provide Aadhaar enrolment facilities at convenient locations in co-ordination with the existing Registrars of UIDAI or by itself becoming UIDAI Registrar themselves :

Provided that, till the Aadhaar is assigned to the individual, the benefits under the Scheme shall be given to such individual, subject to the production of the following documents, namely :-—

(*a*) If he/she has enrolled, his/her Aadhaar Enrolment Identification slip ; and

(*b*) any of the following documents, namely :—

(*i*) Bank or Post Office Passbook with photograph ; or

(*ii*) Any other document as specified by the Government :

Provided further that, the above documents shall be checked by an officer specifically designated by the concerned implementing Agency for that purpose.

**2.** In order to provide benefits to the beneficiaries under the Scheme conveniently, the Department through its Implementing Agency shall make all the required arrangements to ensure that wide publicity through the media shall be given to the beneficiaries to make them aware of the said requirement of Aadhaar.

**3.** In all cases, where Aadhaar authentication fails due to poor biometrics of the beneficiary or for any other reason, the following remedial mechanisms shall be adopted namely :—

(*a*) in case of poor finger-print quality, Integrated Risk Information System scan or face authentication facility shall be adopted for authentication, thereby the Department through its implementing Agencies shall make provisions for Integrated Risk Information System scanners or face authentication along with finger-print authentication for delivery of benefits in a seamless manner ;

(*b*) in case the biometric authentication through finger-prints or Integrated Risk Information System scan or face authentication is not successful, whenever feasible and admissible authentication by Aadhaar One-Time Password (OTP) or Time-based One-Time Password (TOTP) with limited time validity, as the case may be, shall be offered ;

(*c*) in all other cases, where biometric or Aadhaar One-Time Password (OTP) or Time-based One-Time Password (TOTP) authentication is not possible, benefit under the Scheme may be given on the basis of physical Aadhaar letter whose authenticity can be verified through the Quick Response (QR) Code printed on the Aadhaar letter and the necessary arrangement of Quick Response Code reader shall be provided at the convenient locations by the Department through its implementing Agencies.

**4.** In addition to the above, in order to ensure that no bonafide beneficiary under the Scheme is deprived of his/her due benefit, the Department through its implementing Agencies shall follow the exception handling mechanism as outlined in the Office Memorandum of Direct Benefit Transfer Mission, Cabinet Secretariat, Government of India, dated 19th December 2017.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

CHANDRASHEKAR TARANGE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.